# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.05.2025** **वारःशुक्रवार**

---

•पंतप्रधानांच्या हस्ते केरळ आणि मध्य प्रदेशात आज विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण
•मुंबईत पंतप्रधानांच्या हस्ते वेव्हज् परिषदेचं नेत्रदीपक उद्‌घाटन.
•एप्रिल महिन्यात वस्तू आणि सेवा करात विक्रमी वाढ
•राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्राची देशात अव्वल कामगिरी आणि
•दिल्लीत पावसाची संततधार, विमान उड्डाणांवर परिणामाची शक्यता

**<u>केरळपंप्र</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सकाळी केरळमधल्या तिरुवअनंतपुरम विळींझम इथं खोल पाण्यातील आंतरराष्ट्रीय बहुउपयोगी बंदराचं उद्‌घाटन आणि लोकार्पण होणार आहे. विळींझम इथलं हे बंदर देशातील पहिलं अर्धस्वयंचलित तसंच खोल पाण्यातील कंटेनर वाहतूक करणारं बंदर ठरणार आहे. जागतिक नकाशावर केरळचं स्थान ठळक करणारं हे बंदर आजपासून अधिकृतपणे तीन दशकांच्या प्रतीक्षेनंतर आता प्रत्यक्ष कार्यान्वित होणार आहे.

**<u>पंतप्रधानआंध्रप्रदेश</u>**

आंध्र प्रदेशात अमरावती इथं पंतप्रधानांच्या हस्ते ५८ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास कामांची पायाभरणी होणार आहे. देशभरात जागतिक दर्जाची संरचना आणि संपर्क जाळे उभारण्याची वचनपूर्तीचा भाग म्हणून आंध्र प्रदेशातील सात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्‌घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होईल तसंच सहा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प आणि एका रेल्वे प्रकल्पाची पायाभरणीही ते करतील. या विकास कामांमध्ये विधानभवन, उच्च न्यायालय, सचिवालय आणि इतर प्रशासकीय इमारती तसंच रहिवासी इमारती तसंच एकता मॉल यांचा समावेश आहे. पंतप्रधानांच्या हस्ते चौदाशे कोटी रुपये खर्चाच्या क्षेपणास्त्र चाचणी क्षेत्राची पायाभरणी करण्यात येणार आहे.

**<u>पंतप्रधानवेव्ह</u>**

भारतात ऑरेंज इकॉनॉमी म्हणजेच सर्जनकेंद्रित अर्थव्यवस्थेचा उदय होत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत केलं. जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन परिषद 2025 अर्थात 'वेव्हज्' परिषदेचं नेत्रदीपक उद्‌घाटन मोदी यांच्या हस्ते झालं., त्यावेळी पंतप्रधान बोलत होते. आशय, सर्जनशीलता आणि

संस्कृती हे या नव्या अर्थव्यवस्थेचे तीन स्तंभ आहेत. या सर्जनकेंद्रित अर्थव्यवस्थेचा येत्या काही वर्षांत सकल देशांतर्गत उत्पन्नात मोठा वाटा असेल, असा विश्वास मोदी यांनी यावेळी व्यक्त केला. जगातील ॲनिमेशन मार्केट 430 अब्ज डॉलरहून अधिक असून पुढील 10 वर्षांत ते दुप्पट होणार असल्याचं मानलं जातं. भारताच्या ॲनिमेशन आणि ग्राफिक्स उद्योगासाठी वेव्हज् परिषदेमुळे यशाचं दार उघडलं जात असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

मुंबईतल्या जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटरमध्ये झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वे, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी
वैष्णव, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.जयशंकर, माहिती प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह देशविदेशातील मान्यवर उपस्थित होते. भारत आज चित्रपट निर्मिती, डिजिटल कंटेंट, गेमिंग, फॅशन आणि संगीत यांचं जागतिक केंद्र बनला असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं. मात्र मानवाला यंत्र न बनू
देता अधिक समृद्ध आणि संवेदनशील बनवणं गरजेचं असल्याचं मोदी म्हणाले.
भारतात पहिल्यांदाच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी अर्थात IICT मुंबईत सुरु होणार असल्याचं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>महाराष्ट्रदिन</u>**

महाराष्ट्र राज्याचा 66 वा स्थापना दिन काल मोठ्या उत्साहात साजरा झाला.
महाराष्ट्र दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या नागिरकांना मराठी भाषेतून शुभेच्छा दिल्या. मोदी यांनी; या भूमीचा गौरवशाली इतिहास आणि इथल्या जनतेचं धैर्य हे राज्याच्या प्रगतीचे मजबूत आधारस्तंभ आहेत असे गौरवोद्गार काढले. महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दादर इथल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर ध्वजवंदन केलं. महाराष्ट्राला आधुनिक, बलशाली आणि प्रगत राष्ट्र बनवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करू या, असं आवाहन राज्यपालांनी केलं. तसंच राजभवनातही राज्यपालांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आलं.

सीतारामनजीएसटी

एप्रिल महिन्यात वस्तू आणि सेवा कर म्हणजेच जीएसटी संकलनात १२ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांची वाढ होऊन गेल्या महिन्याच्या तुलनेत २ लाख ३६ हजार कोटी रुपयांचा उच्चांकी टप्पा गाठला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, या महिन्यातील केंद्रीय जीएसटी संकलन ४८ हजार ६३४ कोटी रुपये आणि राज्य जीएसटी ५९ हजार ३७२ कोटी रुपये होते. एकात्मिक जीएसटी संकलन एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक होते. तर उपकर १३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होता.

**<u>आयुष</u>**

आयुष प्रणाली आकर्षणाचं केंद्र बनत असून जनऔषधी केंद्राच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय आयुष
राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. पुण्यातल्या लोणावळा इथल्या कैवल्यधाम योग संस्थेमध्ये दोन दिवसांच्या राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेचं उद्घाटन काल केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आयुष औषध केंद्र तहसील स्तरावर  उघडण्यात येणार आहेत. यामुळे आयुर्वेदासह आयुषच्या सर्व यंत्रणांची सर्व औषधे एकाच ठिकाणी स्वस्त दरात उपलब्ध होतील असंही जाधव यावेळी म्हणाले. आयुष मंत्रालयाच्या वाढत्या लोकप्रियतेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**<u>जेनेरिकऔषधं</u>**

राजस्थानमधल्या डॉक्टरांनी फक्त जेनेरिक औषधं लिहून द्यावीत, कोणत्याही विशिष्ट ब्रँडची औषधं लिहून देऊ नयेत, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. औषध कंपन्यांच्या अनैतिक विक्री पद्धतींवर नियंत्रण आणण्यासाठीच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे की, हे निर्देश देशभरात लागू केले गेले तर त्यामुळे मोठा बदल होईल. डॉक्टरांना जेनेरिक औषधे लिहून देण्याचा कायदेशीर आदेश असल्यास औषध कंपन्यांनी डॉक्टरांना लाच देण्याचा प्रश्न सुटेल, अशी टिप्पणीही सर्वोच्च न्यायालयानं केली.

**<u>अप्रेंटिसशिप</u>**

राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्रानं देशात अव्वल कामगिरी केल्याबद्दल केंद्रीय कौशल्य विकास मंत्री जयंत चौधरी यांनी  महाराष्ट्र राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांचं अभिनंदन केलं. केंद्रीय मंत्री जयंत चौधरी यांनी राज्यातील कौशल्य विकास उपक्रमांचा आढावा घेतला आणि विभागाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलं.  कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीला कौशल्य विकास विभागाचे आयुक्त नितीन पाटील, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधुरी सरदेशमुख, रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांच्यासह  वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<u>अमितशहाबोडो</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील सहभागींना सोडणार नसल्याचा पुनरूच्चार काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. दिल्लीत बोडो नेते बोडोफा उपेंद्रनाथ ब्रह्मा यांच्या पुतळ्याचं अनावरण आणि त्यांचा नामनिर्देशित रस्ता समर्पित केल्यानंतर शहा एका सभेला संबोधित करताना बोलत होते. देशाला दहशतवाद मुळापासून उखडून टाकण्याच्या सरकारच्या संकल्पाचा पुनरूच्चार करताना, दहशतवादाविरुद्धची लढाई सुरूच राहिल आणि त्यांना योग्य उत्तर देऊ असंही शहा यांनी स्पष्ट केलं.

भारतीयसमुदायपहलगाम

जगभरातल्या भारतीय समुदायांनी काल पहलगाम हल्ल्यातल्या बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहात घटनेबद्दल दुःख व्यक्त करत अलीकडच्या काळातील सर्वात भयानक हल्ला असं घटनेचं वर्णन केलं आहे. तर हंगेरीची राजधानी बुडापेस्टमधील भारतीय दुतावासानं श्रद्धांजली सभा आयोजित केली

होती तिथे भारतीय समुदाय एकत्र येऊन पीडीतांची प्रार्थना केली. रशियातील सेंट पीटसबर्ग इथल्या वाणिज्य दुतावासातही भारतीय समुदायाच्या सदस्यांनी दोन मिनिट मौन पाळले. अल्जेरियामध्ये भारतीय पायाभूत सुविधा कंपनी इरकॉन इंटरनॅशनल मधील सदस्या आणि त्यांच्या कुटुंबियांनी ठार झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहिली. जर्मनीतही भारतीय समुदायाने बळी गेलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहिली.

**<u>बॅडमिंटन</u>**

चीनमध्ये सुरू असलेल्या सुदीरमन करंडक बॅडमिंटन स्पर्धेत भारतानं इंग्लंडवर ३-२ अशी मात केली. भारताच्या अनुपमा उपाध्यायनं महिला एकेरीत इंग्लंडच्या खेळाडूला पराभूत केलं तर पुरूषांच्या एकेरीत सतीश कुमार करुणाकरण यानंही इंग्लंडच्या खेळाडूला पराभूत केलं. मात्र डेन्मार्क आणि इंडोनेशिया विरूद्धचे सामने हरल्यानं भारतीय संघाला उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्यात अपयश आलं.

**<u>आयपीएलक्रिकेट</u>**

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये काल मुंबई इंडियन्सनं राजस्थान रॉयल्सचा १०० धावांनी पराभव केला. मुंबई इंडियन्सनं दिलेल्या २१८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सचा संघ ११७ धावांवर सर्वबाद झाला.या स्पर्धेत आज, गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना होणार आहे.

**<u>केदारनाथ</u>**

उत्तराखंडमधल्या केदारनाथ मंदिराचे कपाट आज उघडण्यात आले. हिवाळ्यात सहा महिने बंद राहिल्यानंतर आज मंदिराचे दरवाजे खुले करण्यात आले. मंदिर १०८ क्विंटल फुलांनी सजवण्यात आलं आहे. मुख्यमंत्री सीएम पुष्कर सिंह धामी यांनी सपत्नीक केदारनाथाचं दर्शन घेतलं.

**<u>उष्णतेचीलाट</u>**

देशाच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याचा इशारा देण्यात आला असल्याच्या पार्श्वभूमीवर NHRC अर्थात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं महाराष्ट्रासह 11 राज्यांना या लाटेच्या प्रभावाखाली येणाऱ्या लोकांचं संरक्षण करण्यासाठी तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास सांगितलं आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, बाहेर काम करणारे कामगार, वृद्ध, मुले आणि बेघर यांना अधिक धोका असेल असं आयोगानं या राज्यांच्या सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. आयोगाने या पत्रात, उष्णतेशी संबंधित आजारांवर उपचार करण्यासाठी निवारा व्यवस्था, मदत साहित्याचा पुरवठा, कामाच्या
वेळेत सुधारणा आणि मानक प्रक्रियांची उपलब्धता करण्याचं आवाहन केलं आहे.

**<u>दिल्लीपाऊस</u>**

दिल्लीत आजही पावसाची संततधार सुरू आहे. उष्णतेच्या लाटेपासून राजधानीपासून दिलासा मिळाला आहे. उद्याही गडगडाटासह पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दिल्ली आणि परिसरात धुळीचे

वादळ आणि मुसळधार पावसामुळे दिल्ली विमानतळावरील काही उड्डाणांवर परिणाम होऊ शकेल अशी माहिती दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडनं दिली आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.
•पंतप्रधानांच्या हस्ते केरळ आणि मध्य प्रदेशात आज विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण
•मुंबईत पंतप्रधानांच्या हस्ते वेव्हज् परिषदेचं नेत्रदीपक उद्घाटन.
•एप्रिल महिन्यात वस्तू आणि सेवा करात विक्रमी वाढ
•राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्राची देशात अव्वल कामगिरी आणि
•दिल्लीत पावसाची संततधार, विमान उड्डाणांवर परिणामाची शक्यता

**केरळपंप्र**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सकाळी केरळमधल्या तिरुवअनंतपुरम विळींझम इथं खोल पाण्यातील आंतरराष्ट्रीय बहुउपयोगी बंदराचं उद्घाटन आणि लोकार्पण होणार आहे. विळींझम इथलं हे बंदर देशातील पहिलं अर्धस्वयंचलित तसंच खोल पाण्यातील कंटेनर वाहतूक करणारं बंदर ठरणार आहे. जागतिक नकाशावर केरळचं स्थान ठळक करणारं हे बंदर आजपासून अधिकृतपणे तीन दशकांच्या प्रतीक्षेनंतर आता प्रत्यक्ष कार्यान्वित होणार आहे.

**पंतप्रधानआंध्रप्रदेश**

आंध्र प्रदेशात अमरावती इथं पंतप्रधानांच्या हस्ते ५८ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास कामांची पायाभरणी होणार आहे. देशभरात जागतिक दर्जाची संरचना आणि संपर्क जाळे उभारण्याची वचनपूर्तीचा भाग म्हणून आंध्र प्रदेशातील सात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होईल तसंच सहा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प आणि एका रेल्वे प्रकल्पाची पायाभरणीही ते करतील. या विकास कामांमध्ये विधानभवन, उच्च न्यायालय, सचिवालय आणि इतर प्रशासकीय इमारती तसंच रहिवासी इमारती तसंच एकता मॉल यांचा समावेश आहे. पंतप्रधानांच्या हस्ते चौदाशे कोटी रुपये खर्चाच्या क्षेपणास्त्र चाचणी क्षेत्राची पायाभरणी करण्यात येणार आहे.

**पंतप्रधानवेव्ह**

भारतात ऑरेंज इकॉनॉमी म्हणजेच सर्जनकेंद्रित अर्थव्यवस्थेचा उदय होत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत केलं. जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन परिषद 2025 अर्थात ‘वेव्हज्’ परिषदेचं नेत्रदीपक उद्घाटन मोदी यांच्या हस्ते झालं., त्यावेळी पंतप्रधान बोलत होते. आशय, सर्जनशीलता आणि संस्कृती हे या नव्या अर्थव्यवस्थेचे तीन स्तंभ आहेत. या सर्जनकेंद्रित अर्थव्यवस्थेचा येत्या काही वर्षांत सकल देशांतर्गत उत्पन्नात मोठा वाटा असेल, असा विश्वास मोदी यांनी यावेळी व्यक्त केला. जगातील ॲनिमेशन मार्केट 430 अब्ज डॉलरहून अधिक असून पुढील 10 वर्षांत ते दुप्पट होणार असल्याचं मानलं

जातं. भारताच्या ॲनिमेशन आणि ग्राफिक्स उद्योगासाठी वेव्हज् परिषदेमुळे यशाचं दार उघडलं जात असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

मुंबईतल्या जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटरमध्ये झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वे, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी
वैष्णव, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.जयशंकर, माहिती प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह देशविदेशातील मान्यवर उपस्थित होते. भारत आज चित्रपट निर्मिती, डिजिटल कंटेंट, गेमिंग, फॅशन आणि संगीत यांचं जागतिक केंद्र बनला असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं. मात्र मानवाला यंत्र न बनू
देता अधिक समृद्ध आणि संवेदनशील बनवणं गरजेचं असल्याचं मोदी म्हणाले.
भारतात पहिल्यांदाच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी अर्थात IICT मुंबईत सुरु होणार असल्याचं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>महाराष्ट्रदिन</u>**
महाराष्ट्र राज्याचा 66 वा स्थापना दिन काल मोठ्या उत्साहात साजरा झाला.
महाराष्ट्र दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या नागिरकांना मराठी भाषेतून शुभेच्छा दिल्या. मोदी यांनी; या भूमीचा गौरवशाली इतिहास आणि इथल्या जनतेचं धैर्य हे राज्याच्या प्रगतीचे मजबूत आधारस्तंभ आहेत असे गौरवोद्गार काढले. महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दादर इथल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर ध्वजवंदन केलं. महाराष्ट्राला आधुनिक, बलशाली आणि प्रगत राष्ट्र बनवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करू या, असं आवाहन राज्यपालांनी केलं. तसंच राजभवनातही राज्यपालांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आलं.

**<u>सीतारामनजीएसटी</u>**
एप्रिल महिन्यात वस्तू आणि सेवा कर म्हणजेच जीएसटी संकलनात १२ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांची वाढ होऊन गेल्या महिन्याच्या तुलनेत २ लाख ३६ हजार कोटी रुपयांचा उच्चांकी टप्पा गाठला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, या महिन्यातील केंद्रीय जीएसटी संकलन ४८ हजार ६३४ कोटी रुपये आणि राज्य जीएसटी ५९ हजार ३७२ कोटी रुपये होते. एकात्मिक जीएसटी संकलन एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक होते. तर उपकर १३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होता.

**<u>आयुष</u>**
आयुष **<u>प्र</u>**णाली आकर्षणाचं केंद्र बनत असून जनऔषधी केंद्राच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय आयुष
राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. पुण्यातल्या लोणावळा इथल्या कैवल्यधाम योग संस्थेमध्ये दोन दिवसांच्या राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेचं उद्घाटन काल केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या

हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आयुष औषध केंद्र तहसील स्तरावर  उघडण्यात येणार आहेत. यामुळे आयुर्वेदासह आयुषच्या सर्व यंत्रणांची सर्व औषधे एकाच ठिकाणी स्वस्त दरात उपलब्ध होतील असंही जाधव यावेळी म्हणाले. आयुष मंत्रालयाच्या वाढत्या लोकप्रियतेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**जेनेरिकऔषधं**

राजस्थानमधल्या डॉक्टरांनी फक्त जेनेरिक औषधं लिहून द्यावीत, कोणत्याही विशिष्ट ब्रँडची औषधं लिहून देऊ नयेत, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. औषध कंपन्यांच्या अनैतिक विक्री पद्धतींवर नियंत्रण आणण्यासाठीच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे की, हे निर्देश देशभरात लागू केले गेले तर त्यामुळे मोठा बदल होईल. डॉक्टरांना जेनेरिक औषधे लिहून देण्याचा कायदेशीर आदेश असल्यास औषध कंपन्यांनी डॉक्टरांना लाच देण्याचा प्रश्न सुटेल, अशी टिप्पणीही सर्वोच्च न्यायालयानं केली.

**अप्रेंटिसशिप**

राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्रानं देशात अव्वल कामगिरी केल्याबद्दल केंद्रीय कौशल्य विकास मंत्री जयंत चौधरी यांनी  महाराष्ट्र राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांचं अभिनंदन केलं. केंद्रीय मंत्री जयंत चौधरी यांनी राज्यातील कौशल्य विकास उपक्रमांचा आढावा घेतला आणि विभागाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलं.  कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीला कौशल्य विकास विभागाचे आयुक्त नितीन पाटील, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधुरी सरदेशमुख, रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांच्यासह  वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**अमितशहाबोडो**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील सहभागींना सोडणार नसल्याचा पुनरूच्चार काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. दिल्लीत बोडो नेते बोडोफा उपेंद्रनाथ ब्रह्मा यांच्या पुतळ्याचं अनावरण आणि त्यांचा नामनिर्देशित रस्ता समर्पित केल्यानंतर शहा एका सभेला संबोधित करताना बोलत होते. देशाला दहशतवाद मुळापासून उखडून टाकण्याच्या सरकारच्या संकल्पाचा पुनरूच्चार करताना, दहशतवादाविरुद्धची लढाई सुरूच राहिल आणि त्यांना योग्य उत्तर देऊ असंही शहा यांनी स्पष्ट केलं.

**भारतीयसमुदायपहलगाम**

जगभरातल्या भारतीय समुदायांनी काल पहलगाम हल्ल्यातल्या बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहात घटनेबद्दल दुःख व्यक्त करत अलीकडच्या काळातील सर्वात भयानक हल्ला असं घटनेचं वर्णन केलं आहे. तर हंगेरीची राजधानी बुडापेस्टमधील भारतीय दुतावासानं श्रद्धांजली सभा आयोजित केली होती तिथे भारतीय समुदाय एकत्र येऊन पीडीतांची प्रार्थना केली. रशियातील सेंट पीटसबर्ग इथल्या वाणिज्य दुतावासातही भारतीय समुदायाच्या सदस्यांनी दोन मिनिट मौन पाळले. अल्जेरियामध्ये भारतीय पायाभूत सुविधा कंपनी इरकॉन इंटरनॅशनल मधील सदस्या आणि त्यांच्या कुटुंबियांनी ठार झालेल्या

नागरिकांना श्रद्धांजली वाहिली. जर्मनीतही भारतीय समुदायाने बळी गेलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहिली.

**<u>बॅडमिंटन</u>**

चीनमध्ये सुरू असलेल्या सुदीरमन करंडक बॅडमिंटन स्पर्धेत भारतानं इंग्लंडवर ३-२ अशी मात केली. भारताच्या अनुपमा उपाध्यायनं महिला एकेरीत इंग्लंडच्या खेळाडूला पराभूत केलं तर पुरूषांच्या एकेरीत सतीश कुमार करुणाकरण यानंही इंग्लंडच्या खेळाडूला पराभूत केलं. मात्र डेन्मार्क आणि इंडोनेशिया विरूद्धचे सामने हरल्यानं भारतीय संघाला उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्यात अपयश आलं.

**<u>आयपीएलक्रिकेट</u>**

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये काल मुंबई इंडियन्सनं राजस्थान रॉयल्सचा १०० धावांनी पराभव केला. मुंबई इंडियन्सनं दिलेल्या २१८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सचा संघ ११७ धावांवर सर्वबाद झाला.या स्पर्धेत आज, गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना होणार आहे.

**<u>केदारनाथ</u>**

उत्तराखंडमधल्या केदारनाथ मंदिराचे कपाट आज उघडण्यात आले. हिवाळ्यात सहा महिने बंद राहिल्यानंतर आज मंदिराचे दरवाजे खुले करण्यात आले. मंदिर १०८ क्विंटल फुलांनी सजवण्यात आलं आहे. मुख्यमंत्री सीएम पुष्कर सिंह धामी यांनी सपत्नीक केदारनाथाचं दर्शन घेतलं.

**<u>उष्णतेचीलाट</u>**

देशाच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याचा इशारा देण्यात आला असल्याच्या पार्श्वभूमीवर NHRC अर्थात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं महाराष्ट्रासह 11 राज्यांना या लाटेच्या प्रभावाखाली येणाऱ्या लोकांचं संरक्षण करण्यासाठी तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास सांगितलं आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, बाहेर काम करणारे कामगार, वृद्ध, मुले आणि बेघर यांना अधिक धोका असेल असं आयोगानं या राज्यांच्या सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. आयोगाने या पत्रात, उष्णतेशी संबंधित आजारांवर उपचार करण्यासाठी निवारा व्यवस्था, मदत साहित्याचा पुरवठा, कामाच्या
वेळेत सुधारणा आणि मानक प्रक्रियांची उपलब्धता करण्याचं आवाहन केलं आहे.

**<u>दिल्लीपाऊस</u>**

दिल्लीत आजही पावसाची संततधार सुरू आहे. उष्णतेच्या लाटेपासून राजधानीपासून दिलासा मिळाला आहे. उद्याही गडगडाटासह पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दिल्ली आणि परिसरात धुळीचे वादळ आणि मुसळधार पावसामुळे दिल्ली विमानतळावरील काही उड्डाणांवर परिणाम होऊ शकेल अशी माहिती दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडनं दिली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.**